# 3. महिला विकास.

Page No.
Date

1. महिला विकासातील समस्या सांगून शासनाच्या उपाययोजनांना स्पष्ट करा ?

→ **प्रस्तावना :**

20 व्या शतकात महिलांशी संबंधीत अनेक नवीन योजना धोरणे आखण्यात येवू लागली त्यातूनच महिलांच्या विकासासाठी संबंधीत परिषदा जागतिक महिला आयोग, जागतिक महिला दशक, जागतिक महिला वर्ष, राष्ट्रिय महिला आयोग, राज्य महिला आयोग, इतर महिलांशी संबंधीत सर्व सुधारणा करण्यात आल्या असल्या तरी आजही 21 व्या शतकामध्ये महिलांच्या अनेक समस्या पहायला मिळतात.

महिला विकासाची पार्श्वभूमी :

1. संयुक्त राष्ट्र संघटनेने 1946 जागतिक महिला आयोगाची स्थापना.

2. 1952 मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने महिलांच्या विकासासाठी संबंधीत पहिल्या परिषदेचे आयोजन केले.

3. इ.स. 1975 हे वर्ष संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक महिला वर्ष म्हणून जाहीर केला. (समानता - विकास शांततेचे वर्ष).

4. संयुक्त राष्ट्र संघटनेने 1975 मध्ये जागतिक महिलांची एक परिषद भरवली त्यात जागतिक महिला वर्ष व जागतिक महिला दशक साजरा करण्याचा निर्णय घेतला.

5. संयुक्त राष्ट्र संघटनेने जागतिक महिला दशक म्हणून 1976 - 1985 हा कालावधी जाहिर केला

6. महिलांशी संबंधीत जागतिक परिषद
1) मॅकसिको - 1975
2) कोपनहेगन - 1980
3) नैरोबी - 1985
4) बिजींग - 1985

* राष्ट्रीय महिला आयोग
राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम 1990 नुसार 31 Jan 1992 दिल्ली येथे स्थापना केली.

राज्य महिला आयोग.
राष्ट्रिय महिला आयोग अधिनियम 1990 नुसार 25 April 1993 मुंबई येथे स्थापना केली.

जागतिक महिला दिन इ.स. 1911 पासून जगामध्ये महिलांच्या विकास व त्या संबंधी समानता निर्माण करण्यासाठी 8 march हा दिवस साजरा केला जातो. संयुक्त राष्ट्र संघटनेने 25 Nov दिवस जागतिक महिला हिंसाचार विरोधी दिन म्हणून साजरा करण्यात आला.

* महिला विकासातील समस्या.

1) स्त्रीभ्रुणहत्या :
मातेच्या गर्भामध्ये जी हत्या केली जाते. स्त्रीभ्रुणहत्या, जन्मल्यापासून ते एक वर्षाच्या आत लहान स्त्री अर्भकाची हत्या केली जाते.

त्यास स्त्रीअभ्रुक हत्या म्हणतात.

2) बालविवाह :

भारतात प्राचीन काळापासून बालविवाह पद्धती रूढ किंवा प्रचलित असून भारतात आदीम, मागास, डोंगराळ भागांमध्ये बालविवाहाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात आढळते. मुलींना लहान वयातच अनेक जबाबदाऱ्याने सामोरे जावे लागते. आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण होतात.

3) सती प्रथा :

मध्ययुगीन व आधुनिक काळात काही राज्यांमध्ये सती प्रथा चालू होती. यामध्ये पती मेल्यास पत्नीने स्वतःला चितेमध्ये झोकून देणे

4) हुंडा बळी :

भारतात प्राचीन काळापासून वधू पक्षाने वर पक्षाला काही दान म्हणून पैसा, वस्तू, सोन्याच्या स्वरूपात हुंडा देण्याची प्रथा सुरू झाली. आजही खूप मोठ्या प्रमाणात हुंडा - देणे - घेणे हि प्रथा सुरू आहे. जर मुलीच्या वडीलांनी हुंडा कमी दिला किंवा देण्याचा राहून गेला तर मुलींना सासरी खूप मानसिक आणि शारीरिक छळ केला जातो. म्हणून मुली आत्महत्या करतात.

5) छेडछाड :

आजही भारतामध्ये व ग्रामीण व शहरी भागातील सार्वजनिक ठिकाणी मुलींची आणि महिलांची छेडछाड मोठ्या प्रमाणात आहे. शाळा, महाविद्यालय, नोकरीच्या

ठिकाणी महिला आणि मुलींना सार्वजनिक ठिकाणी ऑफिसमध्ये छेडछाड केली जाते. यामध्ये मुली महिला छेडछाडीला कंटाळून आत्महत्या करतात.

6) देवदासीप्रथा :
भारतात प्राचीन काळांपासून देवाची दासी म्हणून सोडले जाते. देवदासी मुलींना नंतर मंदिरातील पुजारी वर्ग व इतर पुरूष यांच्या अत्याचाराला बळी पडावे लागते. यामुळे या मुली आत्महत्या करतात.

7) वेश्या व्यवसाय :
भारत सरकारने वेश्या व्यवसायाच्या विरोधात अनेक कायदे आणि धोरणे आखलेली असली तरी महिला व मुलींची विक्री करूण किंवा बळजबरीने त्याना वेश्या व्यावसायामध्ये ढकलले जाते. यामुळे महिलांचे किंवा मुलींचे आयुष्य नरकासारखे जगावे लागते.

8) विनयभंग : बलात्कार :
भारतात आजही 21 व्या शतकामध्ये महिलांशी संबंधीत अनेक कायदे आणि नियम केले असले तरी भारतात विनयभंग आणि बलात्काराचे अनेक घटना घडत असतात. यामुळे महिला, मुलीची मानसिकता ढासळते. आणि या महिला आत्महत्या-सारख्या पर्यायाची निवड करून स्वत:ला संपवतात.

9) आरोग्याची समस्या :
आजच्या 21 व्या शतकातील fast food च्या युगात मुली आणि महिलांना शरीराला पोषक अशा

अन्न घटकाची पुरतता होत नाही यामुळे महिला व मुलींना अनेक आरोग्य विषयक समस्यांना सामोरे जावे लागते. त्या समस्या शारीरिक मानसिक स्वरूपाच्या असतात.

10) नोकरीच्या ठिकाणी काम करणाऱ्या महिलांच्या समस्या :
आज बरेचश्या महिला व मुली सरकारी व निमसरकारी ठिकाणी नोकरी करतात. नोकरीला जाताना - येताना किंवा नोकरीच्या ठिकाणी वरिष्ठांकडून होणारा अन्याय किंवा अत्याचार याला बऱ्याच महिलांना बळी पडावे लागते.

11) ग्रामीण भागातील महिलांच्या समस्या :
आजही शहरी भागाच्या त्या प्रमाणे विकास झाला त्याप्रमाणे ग्रामीण भागाचा झालेला नसून ग्रामीण भागातील महिलांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. घरातील अज्ञान, दारिद्र्य, पतीकडून होणारी छळवणूक, कामाच्या बदल्यात योग्य पैसा न मिळणे. आर्थिक समस्यांना सामोरे जावे लागणे.

12) कौटुंबिक हिंसाचार :
आज भारतामध्ये प्रत्येक घरामध्ये महिलांवरती हिंसाचार किंवा अज्ञान अत्याचार केला जातो. कुटुंबामध्ये महिला असुरक्षित असतात. सासू - सासरे, दिर - नणंद, जाऊ यांच्याकडून शारीरिक व मानसिक त्रास दिला जातो.

13) शासनाच्या धोरणाचा अभाव :

14 स्वतंत्र स्त्री शिक्षणाचा अभाव :

भारतात स्त्री सबलीकरणासाठी अनेक योजना जाहिर केल्या असल्या तरी महिला मुलींसाठी स्वतंत्र शाळा, महाविद्यालय स्त्री शिक्षकांची नेमणूक, शाळा - महाविद्यालयात जाताना - येताना नसलेली सुरक्षितता शिक्षण विषयक धोरणातील अंमलबजावणीचा अभाव या कारणामुळे बऱ्याचश्या समस्या निर्माण झाल्या आहेत.

* महिला विकासाच्या उपाययोजना.

1) राज्यघटनेतील महिलांशी संबंधीत तरतूदी :

कलम 15 :

राज्यघटनेतील

राज्यसंस्था महिला व बालकांसाठी खास तरतूद

कलम 16 :

महिला आणि पुरूषांना नोकरीच्या समान संधी.

कलम 23 :

व्यक्तीचा अपू व्यापार करता येणार नाही वेठबिगार म्हणून कामावर ठेवणे गुन्हा.

कलम 39 a :

स्त्री आणि पुरूषांना उपजिविकेच्या समान साधन पुरवणे

कलम 39 b :

स्त्री आणि पुरुषांना समान कामासाठी समान वेतन.

Date

कलम ४५ २१ A:

६ ते १४ वयोगट शिक्षण भोजन आणि सक्तीचे.

कलम ४५:

० ते ६ अनौपचारीक शिक्षण.

कलम ५१ अ.

६ ते १४ प्राथमिक शिक्षण देणे पालकाचे कर्तव्य.

कलम २४३ D:

महिलांना पंचायत राजमध्ये आरक्षण.

A - २४३ T:

महिलांचा पंचायतराजमध्ये ३३% आरक्षण.

महिला दिनवेशेष साजरी करण्यात येतात.

संयुक्त राष्ट्र संघटना केंद्र व राज्य सरकार महिलांच्या विकासासाठी पुढील दिनवेशेष साजरी करतात:

१) जागतिक महिला दिन - ८ march १९११ पासून
२) जागतिक महिला हिंसाचार विरोधी दिन २५ Nov
३) जागतिक ग्रामीण महिला दिन १५ Oct.
४) ३ जानेवारी बालीका दिन.

महिलांशी संबंधीत जागतिक परिषद.

मेक्सीको १९७५

या परिषदेमध्ये जागतिक महिला वर्ष म्हणून साजरे करण्याचे ठरवले. १९७५ तर महिला दशक १९७६ ते १९८५ हा कालावधी साजरी करण्याचा निर्णय घेतला.

कोपनहेगन - 1980
या परिषदेत महिलांच्या समस्येवर विचार करून विविध योजना जाहिर करण्यात आल्या.

नेरोबी 1985
महिलांच्या विकासावर चर्चा.

बिजींग 1995
जागतिक स्तरावर विविध योजना जाहिर करण्यात आल्या.

महिलांच्या संबंधीत आयोग.

1) जगामध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेने 1946 - जागतिक महिला आयोग स्थापन केला. तर केंद्र सरकारने संसद कायदयाद्वारे राष्ट्रिय मानवी हक्क अधिनियम 1993 त्यानुसार 12 फेब्रुवारी 1993 रोजी स्थापना केली. 6 मार्च 2001 रोजी राज्य मानवी हक्क आयोगाची स्थापना केली हे तिन्ही आयोग महिलांशी संबंधी समस्यावर विचार करून अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी घटनेतील तरतुदीनुसार न्याय मिळवण्याचे प्रयत्न करतात.

महिला आरक्षण
भारतात प्रथम - कर्नाटक - 1987 = 25 %
1993 च्या 73 व्या आणि 74 व्या घटनेनुसार पंचायत राज व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये 33%. आरक्षण। महाराष्ट्र पहिले राज्य.
महाराष्ट्र सरकारने 21 April 2011 पासून पंचायत राज व स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये 50 %. आरक्षण.

सामाजिक, नोकरी, राजकिय, शैक्षणिक - 33%.

मनोधैर्य योजना.

म.श्रा. 2 oct 2013 पासून बलात्कार पिडीत तरुण मुली आणि महिलांसाठी आर्थिक सहाय्य त्यांचे जीवनमान उंचावण्यासाठी योजना.

कुटुंब न्यायालय कायदा 1984

भारतीय संसदेने कुटुंब न्यायालय 1984 मंजूर करून भारतात कुटुंब न्यायालय स्थापन केले.

भारतात संख्या 488 कुटुंब न्यायालय

महाराष्ट्रात 31

महाराष्ट्रातील पहिले कुटुंब न्यायाल 1988 पुणे मुंबई.

1990 - पुणे - 5

पोटगी, पालकत्व, घटस्फोट, याबाबत निर्णय देण्याचे काम करते

हुंडा प्रतिबंधक कायदा - 1961

संसदेच्या दोन्ही सभागृहांचे संयुक्त अधिवेशन बोलावून हुंडा प्रतिबंधक कायदा 1961 हे विधेयक मंजूर करण्यात आले हा कायदा 1 July 1961 पासून जम्मू काश्मीर वगळता संपूर्ण भारतात लागू केले. या कायद्याने हुंडा देणे आणि घेणे गुन्हा असून एखाद्या विवाहीत मुलीने हुंड्यासाठी आत्महत्या केल्यास 7 वर्षांची किंवा जन्म ठेप किंवा फाशीची शिक्षा देण्यात येते

महिलांच्या संबंधीत कायदे.

1) सती प्रतिबंध कायदा - 1829
2) बाल हत्या, बालविवाह - 1956
3) विधवा पुनर्विवाह - 1856
4) अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा - 1956
5) विवाहाचे वय - संमती वय विधेयक - 1892
6) शारदा कायदा - 1929 (F-12 / M-15)
7) 1978 (F18 - M21)
8) गर्भलिंग निदान कायदा. - 1994

## राष्ट्रीय धोरणे :

1) राष्ट्रीय महिला धोरण 1994 म. पहिले राज्य आहे नंतर त्यात राष्ट्रीय महिला सुधारीत धोरण 2001, 2013 जाहिर करण्यात आली.

11. शिक्षण योजना.
1) सावित्रीबाई फुले दत्तक योजना - 1983
. उपस्थिती भत्ता - 10 Jan 1992
अहिल्याबाई होळकर मोफत बस पास योजना 1996
कस्तुरबा गांधी विद्यालय - July 2004

12 गर्भलिंग निदान कायदा : 1994

असणारी यंत्रे व परवानगी रद्द करून गर्भलिंग निदान कायदा 1994 पासून मंजूर करून मुलींची घटत असलेली संख्या कमी करण्यासाठी लागू केला.

13 महिला हेल्प लाईन.

केंद्र आणि राज्य सरकारने महिलांच्या विविध समस्येवर मात करण्यासाठी. महिला हेल्पलाईन क्रमांक 1098 हा जाहिर केला. त्यानंतर वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आणखीन काही हेल्प लाईन क्रमांक महिलांसाठी जाहिर करण्यात आले.

14. महिला व बालविकास :-

केंद्र सरकारने महिला व बालकांच्या विकासासाठी महिला व बालविकास स्थापन केले. नंतर 1999 मध्ये महिला व बालविकास मंत्रालय असे नाव पडले. एवढ्यावर च सरकार थांबले नाही तर त्यांनी महिला व बाल विकास मंत्री हे स्वतंत्र पद निर्माण केले.

15. महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापन 1975

केंद्र सरकारने 1975 मध्ये संपूर्ण भारतातील महिलांच्या विकासासाठी महिला आर्थिक विकास महामंडळाची स्थापना केली. या द्वारे महिलांना विविध व्यवसाय करण्यासाठी कर्ज महिला बचतगटाची स्थापना करून त्यांसाठी आर्थिक ~~बिक~~ मदत करणे.

16. स्वाधार योजना 2001 - 2002 :

केंद्र सरकारने 2001 -02 मध्ये संपूर्ण भारतात स्वाधार योजना जाहीर केली त्या योजने अंतर्गत विविध धार्मिक ठिकाणी असणाऱ्या विधवा, निराश्रित महिला, कुटुंबानी त्याग केलेल्या मुली व महिला वेगवेगळ्या प्रकारकारच्या पिडीत महिला यांना आश्रय देऊन त्यांच्या पुर्नवसन करण्यासाठी स्वधार योजना.

17. इंदिरा गांधी मातृत्व योजना

२०१० मध्ये देशातील गरोदर माता स्तनदा माता ० ते ६ वयोगटातील लहान बालके यांच्या आरोग्य विषयक सुविधा उपलब्ध करून देणे व इतर सुख-सुविधा मिळवून देण्यासाठी ही योजना सुरू केली.

18. व्यावसायीक शिक्षण

महिला व मुलींना पुरुषांच्या बरोबरीने आणण्यासाठी, त्यांचा आर्थिक दर्जा व जीवनमान उंचावण्यासाठी विविध प्रकारच्या व्यावसायीक शिक्षणाला सुरुवात करण्यात आली
उदा., ब्युटी पार्लर, डि.एड, बि.एड, वैद्यकीय शिक्षण, ITI, IIT, इ.

19) राष्ट्रीय महिला धोरण

इ.स. 1994 मध्ये देशात प्रथम महिला धोरण जाहिर करणारे राज्य म्हणून महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले. केंद्र सरकारने 2001 मध्ये नं राष्ट्रीय महिला धोरण जाहिर केले असून त्यानंतर महिलांच्या विविध समस्या लक्षात घेऊन महिला धोरण जाहिर केले.

20) कौटुंबिक हिंसाचार महिला हिंसाचार कायदा 2005

केंद्र सरकारने संपूर्ण भारतातील महिलांना कौटुंबिक हिंसाचारास बळी पडावे लागते अशा महिलांवर होणाऱ्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी व कुटुंबापासून व कुटुंबातील हिंसाचारापासून न्याय मिळवून देण्यासाठी हा कायदा केला.